क्रमांक: १९८३२/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक: २१ सप्टेंबर, २०२२.

**:: कार्यालयीन आदेश ::**

या सचिवालयातील सेवानिवृत्तीमुळे/ तात्पुरत्या पदोन्नतीमुळे रिक्त झालेल्या **"पंपचालक"** (वेतनस्तर एस-७ : २१७००-६९१००) या पदावर अग्निशामक संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे :-

| अ. क्र. | अग्निशामककाचे नाव |
|---|---|
| १. | श्री.दि.शा.फाटक, अग्निशामक |
| २. | श्री.मोहम्मद जीसान मोहम्मद हसीब, अग्निशामक |
| ३. | श्री.सुधीर ना.रोकडे, अग्निशामक |
| ४. | श्री.राजेश सु.बेरगळ, अग्निशामक |

संबंधित कर्मचाऱ्यांना पंपचालक या पदावर तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

(१) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णया विरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात येत आहेत.

(२) पंपचालक संवर्गातील पदोन्नती तात्पुरत्या स्वरूपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात येत आहेत.

(३) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे श्री.फाटक, श्री.हसीब, श्री.रोकडे, व श्री.बेरगळ यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

..२/-

(४) पंपचालक संवर्गातील सदर पदोन्नती मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अधीन राहून करण्यात येत आहे.

आदेशानुसार,

**(सुभाष नलावडे)**

अवर सचिव,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

**उपरोक्त अग्निशामक.**

**प्रतिलिपी :-**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

४) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

६) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (सदरहू आदेश या सचिवालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.)

८) वैयक्तिक नस्ती.

९) निवडनस्ती